e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: National Interdisciplinary Conference on "Women Empowerment: Issues, Challenges and Solutions"

Organised by: Department of Political Science & I. Q. A. C., Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by PM-UShA Grants to Strengthen Colleges)

# महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानतेचा साहित्यीक आढावा

**सचिन जगन्नाथराव लेंडे**[१]
संशोधक
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय खडकी, अकोला

**प्रा. डॉ. गणेश बोरकर**[२]
संशोधक
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय खडकी, अकोला

DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.59

**प्रस्तावना**

आजच्या २१ व्या शतकातील महिला हया प्रत्येक क्षेत्रात अगेसर आहे. महिला हि शिक्षण घेउन माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कार्य करताना दिसतात तसेच ती मोटारगाडी, आगगाडी, विमान चालविते. अंतराळात झेप घेते व समुद्राच्या तळाशीही संशोधनासाठी जाते. पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून शेतातही राबते. तीला कोणतेही क्षेत्र असाध्य नाही. स्त्रीला अबला समजणारे स्वत: कमजोर समजून समान परंपरेच्या रूढी परंपरेने अन्याय सहन करणारी स्त्री, तिच्यावर अन्याय असहाय झाल्याने संरक्षण मागण्याच्या दृष्टीने दाद मागायला पोलीसाकडे जाणारी स्त्री आज पोलीस क्षेत्रातही आपली कर्तबगारी करून अन्याया विरूध्द अगदी जोमाने लढत आहे. महिला पोलीस कर्मचाऱ्यांना कार्य करतांना दुहेरी भुमिका सांभाळावी लागते. स्त्रीवर कुटुंब रचना आधारित आहे. घर सांभाळण्याची जबाबदारी स्त्रीने आपल्या शिलावर घेतली आहे. परंतु हे दोन्ही कार्य सांभाळण्याची करसत तीला करावी लागते. महिला पोलीस कर्मचारी आपले कुढुंब सांभाळून कर्तव्य पार पाडीत असते. अशा वेळी कार्यक्षेत्रातून उशिरा घरी येणे, कामाचे तास जास्त असणे, अवेळी काम करणे इत्यादी परिस्थितीचा तिचा कौटुंबिक जिवनावर नकारात्मक परिणाम होत असतो. कुटुंबानमध्ये ती आई, बहिण, पत्नीची भुमिका पार पाडत असते. व कौटुंबिक जबाबदारी बरोबर बंदोबस्त, आव्हानात्मक कामे करावी लागत असल्याने त्याचा परिणाम तीच्या कौटुंबिक जिवनावर होत असतो. तसेच महिला पोलीस कर्मचाऱ्यांचा सामाजिक जिवनावर पोलीस सेवेचा परिणाम होत असल्याने त्या कार्याप्रती असमाधानी असतात. महिला पोलीस कर्मचाऱ्याला आव्हानात्मक कामे करावी लागत असल्याने त्याचा प्रमाणे सण समारंभ इत्यादी वेळी बंदोबस्त असल्याने त्या समाजामध्ये असणाऱ्या सामाजनिक समारंभात हजर राहू शकत नाही. महिला पोलीस कर्मचाऱ्यांचा सामाजिक जिवनावर पोलीस सेवेचा परिणाम होत असल्याने त्या कार्याप्रती असमाधानी असतात. महिला पोलीस कर्मचाऱ्याला आव्हानात्मक कामे करावी लागत असल्याने त्याच प्रमाणे सण समारंभ इत्यादी वेळी बंदोबस्त असल्याने त्या समाजामध्ये असणाऱ्या सार्वजनिक समारंभात हजर राहू शकत नाही. त्याचा परिणाम हा त्यांच्या सामाजिक जिवनावर होतो. पोलीस वर्दीमध्ये काम करीत असतांना त्यांचे सामाजिक जीवन सुध्दा प्रभावित झालेले असते.पोलीस सेवेतील जबाबदाऱ्या पार पाडत असतांना त्यांच्या शरिरावर विपरीत परिणाम होतो. १० ते ६ अशी विविध क्षेत्रातील काम करणाऱ्या महिलां सारखे काम पोलीस महिला कर्मचाऱ्याला नसते. त्यांचे कार्य हे चकोरी बाहेरील दैनंदिन बदलाचे व आव्हानात्मक व धाडसाचे असते. त्यामूळे बंदोबस्त व कायदा सुव्यवस्था राखतांना धावपळ करावी लागते. तासंतास उभे राहणे, सतर्कता राखणे, बंदोबसतासाठी अगदी तात्काळ तयार होणे, धावपळ करणे त्यामुळे शारिरीक श्रम होतात. घर, संसार, मुले यांची जबाबदारी असल्याने घरी परत आल्यावर कामे करणे, गृहिणीची जबाबदारी पार पाडणे. या सर्व धावपळीच्या आयुष्यात तिच्या शरिराची झीज होते. शिवाय महिला असल्याने अपत्याचे मुलांचे संगोपन यामध्ये तिच्या शरीरावर सुध्दा परिणाम हातो. त्यामुळे विविध आजारांना सामोरे जावे लागते. महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या शरिरावर तर परिणाम होतोच शिवाय त्यांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. गृहिणी व कर्तव्यदक्ष कर्मचारी या भुमिकेमूळे मानसिक ताण–तणाव येतो. वरिष्ठांची आज्ञा सांभाळणे, वेगवेगळया जबाबदाऱ्या पार पाडणे यामध्ये कसरत होते. व कोणतीही भुमिका पार पाडतांना येणाऱ्या तणावामूळे चिडचिडपणा होतो. हे क्षेत्र पुरूषांतचे असावे स्त्रीयांनी या क्षेत्रात येवू नये अशी मानसिकता असणारे लोक समजात असतात. अशा परिस्थितीमूळे मानसिक खच्चीकरण होते. महिला पोलीस कर्मचाऱ्याला आपली नोकरी करतांना आव्हानात्मक कामे करावी लागतात. त्यांना निवडणुक बंदोबस्त, कोर्ट बंदोबस्त, कार्यालयीन कामे व इतर अनेक कामे पार पाडावी लागतात. अशा परिस्थितीत जीवन जगणाऱ्या महिला पोलीसाबददल वेगवेगळया साहित्यग्रथांमध्ये असलेली लेखकाची मते आपण पाहणार आहोत.

**साहित्य आढावा**

**१. 'वुमन पोलिसिंग' (१९८१) एस.के.घोष:**

एस. के. घोष यांचे हे पुस्तक 'वुमन पोलिसिंग' (१९८१) साली प्रसिद्ध झाले. 'महिला' ब्युरो ऑफ पोलिस रिसर्च अँड डेव्हलपमेंट आणि तसेच पोलिस ऑफिसर ऑफ इंटरनेशनल काऊन्सिलकडून खूप डेटा लेखकाने यात वापरला आहे. ते स्वतः एक पोलिस अधिकारी (उडीसाचे पोलिस निरीक्षक आणि कायदा संशोधन संस्था संचालक, कोलकाता यांचे संचालक होते.) त्यांची पोलिस खात्याविषयी एक अंतर्दृष्टि आहे आणि ते या विषयाला पुरेपूर न्याय देताना या पुस्तकामध्ये दिसून येते. त्यांची स्वत:ची पोलिस पार्श्वभुमी असल्यामुळे जगभरातील पोलिस महिलांची कार्ये अधोरेखित केली आणि भारतीय महिला पोलिसांची भरती, त्यांचे प्रशिक्षण आणि सेवेची परिस्थिती आणि भारतातील महिला पोलिसांचे भविष्य याबद्दल सांगितले. ते प्रथम समाजातील महिलांचे स्थान आणि महिला पोलिसात का असतात आणि हे सर्व कसे सुरू झाले याची चर्चा करतात. या विषयावर चर्चा करण्यासाठी तो युनायटेड किंगडम, अमेरिका, कॅनडा, जपान, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर या देशांचा अभ्यास करतात व इस्त्राईल, पोलंड, मलेशिया, इंडोनेशिया आणि नायजेरिया या देशात महिलांनी पोलिसात कसा प्रवेश केला याबद्दलही ते बोलतात पोलीसांमधील महिलांचा ऐतिहासिक दृष्टिकोन यामध्ये मांडला व पोलिसांमध्ये महिलांची आवश्यकता आणि त्यांच्याद्वारे केली जाणारी विविध कर्तव्ये यांची मांडणी करतात. ते असेही म्हणतात की, महिला पोलिस कामातले सर्व कार्य करू शकतात. त्यांनी भारतीय महिला पोलिस आणि त्यांच्या भविष्याविषयी चर्चा यामध्ये केली आहे. या ग्रंथाद्वारे मोठ्या प्रमाणात तथ्यात्मक डेटा तसेच वैयक्तिक अनुभव याबद्दल डेटा गोळा केला गेला आहे. त्यांनी भारतातील महिला पोलिसांची स्थिती, त्यांची क्षमता यावर चर्चा केली आहे. महिला पोलिसांची भरती प्रक्रिया, प्रशिक्षण, शिक्षण आणि नोकरीच्या अटी व महिला पोलिसांच्या क्षमता व ज्वलंत समस्येसह या ग्रंथात मांडणी केली आहे. पोलिसांमधील स्त्रियांच्या रोजगाराच्या दृष्टिकोनातून मोठ्या प्रमाणात बदल होत गेले आहेत, असे सांगून त्यांनी हा निष्कर्ष काढला. पहिल्या काळात पोलिस विभागाने महिला कैदी किंवा संशयितांचा शोध घेण्यासाठी महिलांची नेमणूक केली. दुस—या कालावधित महिला व किशोरवयीन मुलींना समाजाच्या वाईट शक्तीपासून वाचविण्यासाठी हळूहळू महिलांना मान्यता देण्यात आली. पण ही संख्या खूपच कमी होती. तिसऱ्या कालावधित पोलिसांच्या सर्व प्रकारच्या कामात पुरुष आणि स्त्रियांच्या समानतेवर भर देण्यात आला आणि त्यांना यापुढे मर्यादित उद्देशाने सहाय्यक तज्ञ म्हणून पाहिले गेले नाही. महिला पोलिसांच्या भौतिक बाजू व त्यांची कार्ये करते वेळीची भूमिका तसेच कैटुंबिक जबाबदारी यांची मांडणी त्यांनी केली आहे. हे पुस्तक महिला पोलिस याबाबत आवड असणा—यासाठी खूप महत्त्वपूर्ण आहे. कारण की, या ग्रंथात जगातील महिला पोलिसांबाबत बरीच तथ्यात्मक माहिती आहे.

**२. 'इंडियन पोलिस विमेन' (१९८२) आमरजित महाजन:**

आमरजित महाजन यांचे 'इंडियन पोलिस विमेन' यांचे पुस्तक (१९८२) साली प्रसिध्द झाले. भारतीय पोलिस महिला या पुस्तकात महिला पोलिसांना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले गेले आहे. यामध्ये तीन राज्यांतील महिला पोलिसांचा अभ्यास करण्यात आला आहे, ती राज्ये म्हणजे हिमाचल प्रदेश, पंजाब आणि चंदीगड होती. महाजन यांनी त्यांचे नमुने हे दोन पध्दतीने घेतले एक नमुना जुन्या म्हणजे १९७४ पर्यंत भरती केलेल्या महिला पोलिसांचा आणि दुसरा म्हणजे नवीन १९७५ आणि त्यानंतरच्या महिला पोलिसांमध्ये भरती झालेल्या याबाबत महाजन यांनी या पुस्तकामध्ये महिला पोलिस भरती, प्रशिक्षण, वेतन व अटी इत्यादींचे वर्णन केले आहे. त्यांच्या सामाजिक—आर्थिक पार्श्वभूमीवर, महिला पोलिसांच्या भूमिकेच्या कार्यक्षमतेवर भर देण्यात आला आहे, ते भूमिका वटवणा—याच्या संघटनात्मक, सामाजिक दृष्टिकोनातून महिला पोलिस आधिका—यांच्या भूमिकेचे मूल्यांकन करतात.

महाजन यांनी अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की, महिला पोलिस कर्मचा—याच्या नैतिक कार्याबद्दल पुरुष अधिका—यांचा नकारात्मक दृ ष्टिकोन दिसून येतो. महिला पोलिस नोकरी करण्यास असमर्थता आणि काही प्रमाणात महिला पोलिसांसोबत पुरुष पोलिस काम करण्यास नकार. महिला पोलिसांच्या महिलांच्या स्पष्ट भूमिका आणि परिभाषा या पोलिस दलाच्या प्रगतीस अडथळा आणणारे सर्वात महत्त्वाचे घटक म्हणजे पुरुष घटक आहेत.

जरी महिला पोलिस पोलिसी गणवेश परिधान करीत असल्या तरी त्यांना पुरुष पोलिसांसारखे पद, वेतन, भत्ते मिळत असले तरी त्यांच्याकडुन पोलिसांची जी कामे असतात ती त्यांना करता येत नाहीत. ते पुढे म्हणाले की, पोलिसांमध्ये महिला पोलिसांची नवीन भूमिका महिला पोलिस यांचे पोलिसांमध्ये वाढणारे प्रमाण अप्रिय आहे. त्यांना असे दिसून आले की, पोलिस दलात पुरुष, महिला व समाजाकडून मोठया प्रमाणात मान्यता आणि स्वीकृती मिळणे बाकी आहे. जर महिला पोलिसांच्या कामाचे स्वरूप सामाजिक कार्यकर्त्यासारखे असले तर ते अधिक आकर्षक बनविले जाऊ शकते.

**३. 'वुमन पोलिस इंडिया' (१९९१) विष्णोई ओम राज सिंग:**

विष्णोई ओम राज सिंग 'वुमन पोलिस इंडिया' (१९९१) या लिहिलेल्या या ग्रंथामध्ये शहरातील महिला पोलिसांच्या बहुआयामी भूमिकेवर लक्ष केंद्रित केले गेले आहे ज्याचा संदर्भ दिल्लीच्या संदर्भात आहे. दोन भिन्न दृष्टिकोनातून या विषयाकडे लक्ष दिले गेले आहे. एक महिला आणि दुसरी पोलिस यंत्रणा या वर भर दीला आहे.

संपूर्ण ग्रंथ हा १० प्रकरणात विभागला गेला आहे. पहिल्या प्रकरणात भारतासाठी विस्तीर्ण स्तरावर आणि दिल्लीत सूक्ष्म स्तरावर महिला पोलिसांच्या वाढीचा संक्षिप्त इतिहास आहे. दुसऱ्या प्रकरणात कार्यपध्दती वर्णन करतात, तिसऱ्या प्रकरणात दिल्ली संबंधी भौगोलिक व ऐतिहासिक माहिती यामध्ये दिली गेली आहे. चौथ्या प्रकरणात अनुभवजन्य आधारित आहे आणि उत्तर देणाऱ्यांचे सामाजिक माहितीचे वर्णन केले गेले आहे, पाचव्या आणि सहाव्या प्रकरणात

तांत्रिक आणि प्रक्रियात्मक पैलूंचे परीक्षण केले आहे. सातव्या प्रकरणात महिला पोलिसांची कार्ये, भूमिका आणि त्यांच्या समस्या विषयी माहिती दिली आहे. आठ मध्ये महिला पोलिसांबद्दलच्या लोकांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

नवव्या प्रकरणात समाज कल्याण आणि सामाजिक बदलांमध्ये महिला पोलिसांच्या भूमिकेचे परीक्षण केले गेले आहे. अभ्यासाचे निष्कर्ष व सूचनांवर शेवटच्या म्हणजेच दहाव्या प्रकरणात केले आहे. विष्णोई यांनी पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढुन काही सुचना केल्या आहेत.

विष्णोई यांनी पुढीलप्रमाणे सूचना केल्या आहेत.

१. काही तरुण शिक्षित पोलिस महिलांनी पोलिसांची त्यांची स्थिती व भूमिका याबद्दल असमाधान व्यक्त केले होते. प्राधिकरणाने काही पर्यवेक्षी प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर आखण्याची गरज आहे.

२. ड्युटी ऑफिसर म्हणून पोलिस ठाण्यात महिला अधिका—यांची नेमणूक केल्याच्या अनुभवामुळे पोलिस महिलांना तक्रारींशी मानवी पध्दतीने संवाद साधण्याची संधी यापूर्वीच मिळाली आहे आणि याचा उपयोग पोलिस जनसंपर्क सुधारण्यासाठी केला जाऊ शकतो.

३. बऱ्याच पोलिस महिलांना आपल्या मुलांची काळजी घेण्यासाठी वेळ देणे कठीण जाते. पोलिस वसाहतींच्या आवारात चोवीस तास मुलांची काळजी घेण्याची सुविधा उपलब्ध झाली असती तर जे लोक निवासस्थानाचा लाभ घेत होते त्यांच्यापैकी बऱ्याच लोकांसाठीही समस्या मोठ्या प्रमाणात कमी झाली असती.

४. त्याचप्रमाणे कामाच्या ठिकाणी वाहनांची तरतूद व इतर काही कमीत कमी सुविधा यामुळे कामकाजाच्या परिस्थितीत सुधारणा होऊ शकते आणि यामुळे त्यांचे मनोबल चांगले होईल.

समकालीन भारतीय समाजातील वेगाने बदलणारी स्थिती ताळमेळ ठेवण्यासाठी व सामाजिक परिस्थितीला चालना देण्यासाठी पोलिस यंत्रणेच्या आधुनिकीकरण आणि मानवीयकरणाच्या प्रक्रियेविरुध्द पोलिसांमधील महिलांच्या प्रवेशाकडे पाहिले गेले आहे. या ग्रंथात प्रशासकीय रचनेतील महिलांचे स्थान आणि महिला पोलिसांच्या विविध भूमिकेविषयी समजून घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**४. 'परफॉमन्स ऑफ वुमन पोलिस' (२००६) अली अ.प. महम्मद:**

अली अ.प. महम्मद. 'परफॉमन्स ऑफ वुमन पोलिस' (२००६) यांनी लिहिलेल्या या ग्रंथात तामिळनाडू या राज्यातील महिला पोलिस यांचा अभ्यास करण्यात आला आहे. अली यांनी त्यांच्या अभ्यासामध्ये महिला पोलिस दलातील महिला पोलिसांची त्यांच्या सेवेमध्ये येणाऱ्या कठीण परिस्थितीची, त्यांच्या संघर्षाची माहिती यात दर्शविली आहे. ज्यामध्ये पूर्वीच्या काळात स्त्रियांना सामाजिक बंधनात रहावे लागत असे. पोलिस सेवेत प्रवेश घेतल्या नंतरही, पुरुष वर्चस्व असलेल्या संघटनेत त्यांची स्वीकृती पूर्णपणे मानण्यात आली नव्हती आणि महिला पोलिसांना फक्त बालके, महिला गुन्हेगार या संवेदनशील कामांपुरतेच मर्यादित ठेवले होते. पुरुष तातडीने पोलिस दलात महिलांना सामील करण्यास तयार नव्हते किंवा त्यांना त्यांच्याबरोबर काम करण्यास आवडत नसे.

तामिळनाडू राज्यातील महिला पोलिस दलाची स्थापना स्त्रिया आणि बालगुन्हेगार यांचा तपास करण्याच्या मुख्य उद्देशाने केली गेली. अशी समजूत होती की, स्त्रिया दया, करुणा, सन्मान आणि सन्मानाने पीडित महिला, पीडित बालके यांच्याशी कौशल्य आणि संयमाने व्यवहार करतील असे गुण त्यांच्यात असतात. म्हणूनच, तमिळनाडू राज्यात महिला पोलिसांना देण्यात आलेल्या विविध कामांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्याची गरज होती. ती या ग्रंथात महिला पोलिसांची अनेक तथ्ये समोर आणली आहेत. जसे की, त्यांची कार्यक्षमता असूनही त्यांचा वापर पोलिस दलात अद्याप तरी पूर्ण वापरला जाऊ शकलेला नाही. संपूर्णपणे तामिळनाडू राज्यातील महिला पोलिसांच्या कामगिरीचा उलगडा करून हा अभ्यास करण्याची गरज सर्वसमावेशकपणे अधोरेखित झाली होती. या ग्रंथात तक्रारदार, पीडित, साक्षीदार, आरोपी आणि त्यांच्या मनोवृत्तीवरुन महिला पोलिसांना बगल दिली जाते. या व्यतिरिक्त महिला पोलिस इतिहासाविषयी वैशिष्टये, कुटुंब आणि समाजातील त्यांच्या अडचणी, कामकाजाची परिस्थिती आणि त्यांना पुरविल्या जाणाऱ्या सुविधा इत्यादी गोष्टीविषयी काही महत्त्वाची उद्दिष्टे विचारात घेतली होती.

तामिळनाडू राज्यातील महिला पोलिसांचा पध्दतशीर अभ्यास करून त्यास संशोधनाच्या अंतर्गत वर्गीकृत केले गेले आहे, तमिळनाडूतील महिला पोलिस आणि मुख्य आरोपी आणि पीडित महिला पोलीसांद्वारे अंतर्विचार करून मुलाखत वेळापत्रक काही मुख्य रूपे घेऊन, त्यांचे पोलिस, त्यांचे वय, लिंग आणि पोलिसांच्या कारकीर्दीची निवड करण्याचे कारण, नोकरीतील समाधानाची पातळी आणि त्यांच्या समस्या यावर आधारित पोलिस वर्णनाचे कारण, अत्यंत वर्णनात्मक आणि सर्वसमावेशक प्रश्न समाविष्ट करून मुलाखतीचे वेळापत्रक तयार करून माहिती गोळा केली आहे.

महिला पोलिसांच्या कामगिरीचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने, महिला पोलीसांबद्दल तक्रारदार, पीडित, साक्षीदार, त्यांच्याकडून घेतलेल्या जबाबदाऱ्या आणि त्यांचे कर्तव्य बजावताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास या उद्देशाने संशोधन करण्यात आले.

अली यांच्या संशोधनातून महिला पोलिसांच्या संदर्भात काही वैशिष्टयपूर्ण निष्कर्ष समोर आले आहेत, जे खाली नमुद केले आहेत. (१) अध्ययनात आढळलेले निष्कर्ष:


Special Issue: National Interdisciplinary Conference on "Women Empowerment: Issues, Challenges and Solutions"
Organised by: Department of Political Science & I. Q. A. C., Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by PM-UShA Grants to Strengthen Colleges)

(अ) महिला पोलिस त्यांच्या नोकरीवर समाधानी आहेत पण त्यांच्या कामकाजाच्या स्थितीशी नाहीत. जे दीर्घ वेळेपर्यंत काम करण्याशी, अपुऱ्या सुविधा, इ.

(ब) महिला पोलिसांना त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून किंवा इतर प्रभावी व्यक्तींकडून, त्यांच्या कामात हस्तक्षेप केल्याशिवाय त्यांना काम करण्याची परवानगी नाही.

(क) त्यांना काम देताना लैंगिकतेच्या आधारे भेदभाव केला जातो.

**५. 'महिला पोलिस अधिकार एंव कर्तव्य' (२०१२) सॉरिवाल अमित:**

सॉरिवाल अमित. 'महिला पोलिस अधिकार एंव कर्तव्य' (२०१२) यांनी लिहलेल्या या ग्रंथामध्ये उत्तर प्रदेशातील महिला पोलिस यांचा अभ्यास करण्यात आला आहे. पोलिस विभागात महिलांचे आगमन हे मध्यम वर्गासाठी हे विस्मयकारक होते. कारण मध्यम वर्ग हा असा वर्ग आहे जो परिवर्तन हे लवकर स्वीकारत नाही. पण नंतर हळूहळू या वर्गाने पण स्वीकारले की, महिला पोलिस विभागात दक्षतापूर्ण काम करू शकतात व सेवेमध्ये येण्यात काही हरकत नाही. तरीसुध्दा समाजात एक मोठा वर्ग असा आहे, जो पोलिस विभागासंबंधी मनात अनेक चुकीच्या धारणा घेऊन बसला आहे. लोकांची अशी मान्यता आहे की, पोलिस विभागात अश्लिलता अधिक आहे. तिथे अश्लिल शब्दावली (शिव्या) व्यतिरिक्त काम केले जात नाही. त्यामुळे अशा महिला पोलिस परिवारासोबत योग्य पध्दतीने राहू शकत नाहीत तर आणखी काही चिंतेपैकी एक म्हणजे पोलिसांच्या अनियमित कार्यामध्ये घर व परिवार, समाज यास कसे सुरक्षित ठेवू शकते. महिला पोलिसांची सामाजिक जीवन कसे चालू शकते? महिला पोलिसांची रोजची दिनचर्या काय असते? असे अनेक प्रश्न हे जनमाणसांत विचारले जात. त्यामुळे या विषयावर अभ्यास करण्याची इच्छा जागृत झाली. व त्यानी तो विषय निवडला व ९ वेगवेगळया प्रकरणात सविस्तर अशी मांडणी केली आहे.

प्रकरण १ परिचय यामध्ये ते असे सांगतात की, सर्व विकसित व विकसनशिल देशात पितृसत्ताक असलेला समाज दिसून येतो. ही व्यवस्था अनेक देशांत जरी असली ता महिलासांठी काही विशेष योजना लागू केल्या आहेत ज्यामध्ये शिक्षण, रोजगार, व्यवसाय, याकरीता महिलांना विशेष सुविधा दिल्या जातात. तरीसुध्दा समाजतील पुरुषवादी मानसिक संरचनेमुळे महिलांच्या स्थिती व स्तरामध्ये कोणताही फरक दिसून येत नाही. लेखक याच प्रकरणात पोलिस शब्दाची उत्पत्ती व प्राचीन भारतातील पोलिसांचा इतिहास, ब्रिटिश काळातील पोलिस संघटन, भारतीय पोलिस आयोग, भारत स्वातंत्र्य प्राप्ती नंतर पोलिस दल, व पोलिसांचे वर्तमान स्वरूप या संबंधी माहिती देतात. प्रकरण २ महिला पोलिस इतिहास व संघटन या प्रकणात लेखक अनेक देशातील महिला पोलिसांचा इतिहास याची माहिती देतात. पुढे याच प्रकरणात लेखकाने भारतातील महिला पोलिस यांचा इतिहास नमुद केला आहे. महिलांबाबत अशी माहिती प्राप्त होते की, महिला या प्राचीन काळापासून पोलिस व गुप्तचर स्वरूपात काम करीत. याचा उल्लेख कोटिल्याचा प्रसिध्द ग्रंथ 'अर्थशास्त्र' यात मिळतो. प्रकरण ३ 'अभ्यास पध्दती' या मध्ये सामाजिक संशोधनाच्या उद्देशाने सामाजिक घटनांचा वैज्ञानिक पध्दतीने अभ्यास करून त्या विषयातील वास्तविक ज्ञान प्राप्त करण्यासाठी लेखकाने भारततील सर्वात मोठे राज्य उत्तर प्रदेश येथील महिला पोलिस यांची निवड केली. प्रस्तुत शोधाकरीता अभ्यास क्षेत्राचे दोन विभागाची निवड केली एक म्हणजे आगरा व दुसरे रोहिलखंड. आगरा विभागात ७ जिल्हे आगरा, अलिगढ, एटा, फिरोजाबाद, महामायानगर, मैनपुरी व मथुरा तर दुसऱ्या विभागातील रोहिलखंड या अंतर्गत बरेली, मुरादाबाद येते.

**६.'भारत मे महिला पोलिस की समस्या' (२०१८) भारद्वाज कमलेश, कुमर अवधेश:**

भारद्वाज कमलेश, कुमर अवधेश 'भारत ने महिला पोलिस की समस्या' (२०१८) यांनी प्रस्तुत ग्रंथात पोलिस विभागात कार्यरत असणाऱ्या महिला पोलिसांच्या विभिन्न समस्यांवर प्रकाश टाकला आहे. पुस्तकात पोलिस विभागात कार्यरत महिला पोलिस समक्ष कोणत्या प्रकारे भूमिका संघर्षाची स्थिती आहे व ते या सघर्षांतून कसे मुक्त होवू शकतात, कशा प्रकारे गृहीणी व पोलिस या दोन्ही भूमिका सामजस्याने बजावतात. तसेच शासन व प्रशासनाच्या दबावापासून कसे स्वत:ला वाचवतात, स्वत:ला सुरक्षित अनुभव करण्यासाठी काय प्रयत्न करतात? पुस्तकात महिला पोलिसांच्या विभिन्न समस्यांचे निराकरण हेतू अनेक उपाय दिले आहेत.

या पुस्तकात ६ प्रकरणे आहेत प्रकरण १ मध्ये प्रस्तावना केली आहे. त्यात विभिन्न कालखंडात भारतीय समाजातील महिलांची स्थिती मांडली आहे. यात प्रामुख्याने वैदिक काळातील महिलांची स्थिती, उत्तर वैदिक काळातील महिलांची स्थिती, मध्यकाळातील महिलांची स्थिती, ब्रिटिश काळातील महिलांची स्थिती, स्वतंत्र्यप्राप्ती नंतर महिलांच्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे.

याच प्रकरणात पोलिस व्यवस्था व उगम आणि विकास यांचा ऊहापोह करण्यात आलेला आहे. स्वातंत्र्य नंतर भारतातील पोलिस व्यवस्था याचा अभ्यास केला गेला आहे व त्यानंतर महिला पोलिसांचा उगम व विकास यावर माहिती देण्यात आली आहे. लेखकाने महिला पोलिस या संबंधीत साहित्याचे पुनरावलोकन केले आहे. यात विदेशी लेखक व भारतीय लेखकांच्या पोलिस साहित्याविषयी माहिती देण्यात आली आहे. लेखक पुढे आपल्या अभ्यासाचे उद्देश मांडतात व प्रकल्पनाचे प्रस्तुतीकरण करतात व अभ्यासचे महत्त्व विशद करतात. प्रकरण २ शोध पध्दती यात लेखकांने संशोधनाचे प्रारूप, संशोधनाचे प्रकार, तथ्य संकलनाची पध्दत, प्रश्नावलीचे महत्त्व, अनुसूची चे महत्त्व, मुलाखतीचे महत्त्व, सुचनाचे स्त्रोत, यांची माहिती सविस्तरपणे मांडली आहे. पुढे ते अभ्यास क्षेत्राचे संक्षिप्तपणे माहिती देतात. अभ्यास क्षेत्र म्हणून लेखकाने उत्तर प्रदेशातील गाजियाबाद व गौतमबुद्ध नगर पोलिस मुख्यालय या अंतर्गत

असणाऱ्या महिला पोलिस यांची निवड केली.प्रकरण ३ मध्ये उत्तरदात्याची माहिती जसे वय, जात, धर्म, वैवाहिक स्थिती, आर्थिक स्थिती, इत्यादी माहिती गोळा केली आहे, तर प्रकरण ४ मध्ये गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे. प्रकरण ५ मध्ये महिला पोलिसांच्या सामाजिक समस्या यांचा अभ्यास करण्यात आला आहे. या मध्ये सामाजिक समस्या, महिला पोलिसांच्या शासन व प्रशासनसंबंधी समस्या, महिला पोलिसांच्या इतर अन्य समस्या, महिला पोलिसांच्या भुमिकांचे मुल्यांकन लेखकांने या प्रकरणात केले आहे. प्रकरण ६ परिकल्पना सत्यता व निष्कर्ष व उपायांमध्ये परिकल्पनेची सत्यता जाणून घेतली व निष्कर्ष मांडले. या पुस्तकाद्वारे लेखकांने महिला पोलिस यांची अत्यंत महत्त्व पूर्ण माहिती समोर आणली आह.

:::. Cite this article .:::

लेंडे, सचिन जगन्नाथराव, & बोरकर, प्रा. डॉ. गणेश. (2024). महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्य समाधानाचा साहित्यिक आढावा. SK International Journal of Multidisciplinary Research Hub, 11(12), 291–295. https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.59